# मृत्युपत्र नोंदणी

अ. मृत्युपत्र नोंदणी करण्यासाठी मृत्युपत्रकर्ताकडून करावयाची कार्यवाही-

1. मृत्युपत्राचा दस्त तयार करणे
2. मृत्युपत्रावर दोन साक्षीदारासमोर सही/सहया करणे

3. ज्या दुय्यम निबंधकाचे कार्यक्षेत्रात वास्तव्य करीत असेल किंवा ज्या कार्यक्षेत्रात मृत्युपत्रावर सही केली असेल किंवा त्यास जे दुय्यम निबंधक कार्यालय सोयीस्कर असेल,अशा दुय्यम निबंधक कार्यालयात मृत्युपत्र नोंदणीस सादर करणे

4.दुय्यम निबंधकासमोर मृत्युपत्रावर केलेल्या निष्पादनाचा कबुलीजबाब देणे

5. त्यांना असलेल्या दोन ओळखदार यांना त्यांची ओळख पटविण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थीत करणे.

6.रुपये 100/- इतकी नोंदणी फी व दस्त हाताळणी शुल्क प्रती पान रुपये 20/- प्रमाणे दुय्यम निबंधकाकडे जमा करणे

7.दस्तामध्ये स्वतःचे व दोन ओळखदारांच्या ओळखपत्रांची प्रती लावणे

ब. मृत्युपत्र नोंदणी करण्यासाठी दुय्यम निबंधकाकडून करावयाची कार्यवाही-

1.वरीलप्रमाणे कागदपत्रे असल्याची खातरजमा केल्यानंतर दस्त नोदंणीस दाखल करुन घेणे

2.रुपये 100/- नोंदणी फी व दस्त हाताळणी शुल्क प्रती पान रुपये 20/- प्रमाणे जमा करुन घेणे

3.मृत्युपत्रकर्ता यांचा कबुलीजबाब नोंदविणे

4.मृत्युपत्रकर्ता यांना ओळखत असलेल्या दोन ओळखदाराची ओळख घेणे

5.दस्त नोंदणी पूर्ण करून स्कनिगला करुन घेणे

6.मूळ दस्त,थबनेल प्रींट,सीडी मृत्युपत्रकर्ता यांना देणे